प्रेसनोट दि. १७/११/२०१७

**संघटीत गुन्हेगारी विरोधी पथक, उत्तर विभाग, गुन्हे शाखा, पुणे शहर पथकाकडून मोका गुन्हयातील फरारी आरोपीस १ गावठी पिस्टल, ३ जिवंत काडतुसे असे किं.रु. ३५,९००/- चे अग्निशस्त्रासह अटक**

दिनांक १६/११/२०१७ रोजी संघटीत गुन्हेगारी विरोधी पथक, उत्तर प्रादेशिक विभाग, गुन्हे शाखे मधिल निलेश शिवतरे यांना त्यांचे बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, राजगड पोलीस स्टेशन ता.भोर जि.पुणे येथील मोका गुन्हयातील फरारी आरोपी नामे राहुल चंद्रकांत पवार, वय २४ वर्षे, रा.नसरापुर, ता.भोर,जि.पुणे हा वडगाव बुद्रुक गावठाणाजवळील कॅनल पुला शेजारी, सिंहगड रोड,पुणे येथे मित्रांना भेटण्यासाठी येणार असुन त्याचेकडे गावठी पिस्टल असल्याची खात्रीशीर बातमी मिळाल्याने पोलीस निरीक्षक ब्रम्हानंद नाईकवाडी यांनी मा. वरीष्ठांची पुर्व परवानगी घेवुन स्टाफसह सदर ठिकाणी सापळा रचुन त्यास पकडुन त्याचे ताब्यातुन एक देशी बनावटीचे लोखंडी पिस्टल, व ३ जिवंत काडतुसे जप्त केले आहेत. व त्यास अटक करुन सिंहगड रोड पोलीस स्टेशन पुणे येथे गु.र.नं.३०५१/२०१७ भारतीय हत्यार कायदा क. ३(२५), व महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम, ३७(१) सह १३५ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. वर नमुद **आरोपी नामे राहुल चंद्रकांत पवार, याची भोर तालुक्यामध्ये गुन्हेगारी टोळी असुन त्याचे टोळीमध्ये ७ सदस्य आहेत त्यांचेवर राजगड पोलीस ठाणे येथे खुन, खुनाचा प्रयत्न, पळवुन नेणे, गंभिर जखमी करणे, जागा मालकांना अडथळा करुन जागेचा कब्जा घेणे, व पिस्टलचा धाक दाखवुन जिवे मारण्याची धमकी देणे अशा प्रकारचे खालील प्रमाणे ६ गंभिर गुन्हे दाखल आहेत.**

(१)११/१२ भादिव कलम ३२६,३२४,३२५,५०४,५०६,३४,

(२)५४/२०१३ भादवि कलम ४३५,४५२,३४

(३)६३/२०१४ भादवि कलम ३०७,३२३,५०४,५०६

(४)११५/२०१४ भादवि कलम ३०२,३०७,१२०ब,२०१

(५)८३/२०१६ भादिव कलम ३६३,३४१,५०४,५०६,३४

(६)१२१/२०१६ भादविकलम ३०७,२१२,३२३,५०४,५०६,३४, मोका कायदा कलम ३(२५) **असे एकुण ६ गुन्हे दाखल असुन सध्या तो सदर चे मोका केसमध्ये फरारी आहे.**

सदरची कारवाई ही मा. अपर पोलीस आयुक्त सो. श्री प्रदीप देशपांडे मा. पोलीस उप आयुक्त, गुन्हे, श्री पंकज डहाणे सो.,मा. सहा. पोलीस आयुक्त, गुन्हे- २ श्री संजय निकम सो., यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री ब्रम्हानंद नाईकवाडी, सपोनि गणेश पवार, व पोलीस कर्मचारी निलेश शिवतरे, भालचंद्र बोरकर, तानाजी गाडे, अतुल मेंगे, दत्ता फुलसंदर, कांतीलाल बनसुडे, राजु मोरे, हजरत पठाण, नवनाथ चांदणे, चापोना शितल शिंदे यांनी केली आहे.